# महाराष्ट्र विधानसभा

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम
## शनिवार, दिनांक २५ मार्च, २०१७
## (सकाळी १०.०० वाजता)

एक : प्रश्नोत्तरे.

दोन : कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे -

| | | |
|---|---|---|
| (१) जलसंपदा मंत्री | : | मा.राज्यपाल महोदयांनी पाटबंधारे विकास क्षेत्रासंदर्भात दिलेल्या निदेशांच्या अनुषंगाने सन २०१७-२०१८ च्या वार्षिक आखणीच्या नियोजनाबाबतचा तपशील सभागृहाच्या पटलावर ठेवतील. |
| (२) सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री | : | विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकासमंडळे आदेश, २०११ मधील नियम ८ अन्वये सार्वजनिक आरोग्य विभागाचा सन २०१५-२०१६ या वित्तीय वर्षातील योजनांतर्गत आणि योजनेत्तर योजनांवरील वैधानिक विकास मंडळनिहाय (अविभाज्य भागासह) प्रत्यक्ष खर्चाचा तपशील सभागृहासमोर ठेवतील. |

तीन : लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) :

(१) सर्वश्री.दिलीप वळसे-पाटील, अजित पवार, जयंत पाटील, पांडुरंग बरोरा, शशिकांत शिंदे, राधाकृष्ण विखे-पाटील, अमीन पटेल, सुनिल केदार, मो. आरिफ (नसीम) खान, अजय चौधरी, जयदत्त क्षीरसागर, राजेश टोपे, श्रीमती दिपिका चव्हाण, सर्वश्री. सुरेश लाड, हसन मुश्रीफ. वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे शालेय शिक्षण मंत्र्याचे लक्ष वेधतील :-

"महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाकडून दि. २८ फेब्रुवारी, २०१७ पासून सुरु करण्यात आलेल्या बारावीच्या परिक्षेची प्रश्नपत्रिका

*परिक्षा सुरु होण्या अगोदर तब्बल २५ मिनिटांपूर्वी म्हणजेच १०.४० मिनीटांनी प्रश्नपत्रिका व्हॉटसॲपवर उपलब्ध झाल्याचे निदर्शनास येणे, विद्यार्थ्यांना प्रश्नपत्रिका वाचण्यासाठी देण्यात आली असतानाच ही घटना घडल्याचे पुन्हा एकदा समोर येणे, इंग्रजी, गणित, एसपी आणि मराठी या विषयांच्या प्रश्नपत्रिका मुंबई परिसरात व्हॉटसॲप या सामाजिक माध्यमावर उपलब्ध झाल्याचे समोर येणे, याबाबत मंडळाच्या मुंबई विभागीय कार्यालयाकडून तसेच शासनाकडून कोणतीच दखल घेतली न जाणे, त्यामुळे विद्यार्थी व पालकांमध्ये पसरलेला असंतोष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया".*

*(२) ॲड. यशोमती ठाकूर, सर्वश्री.सुनिल केदार, अस्लम शेख, डॉ. संतोष टारफे वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सार्वजनिक आरोग्य मंत्र्याचे लक्ष वेधतील :-*

*"अमरावती जिल्हा येथील स्त्री रुग्णालयात गत नऊ महिन्यात ६ हजार १४४ अर्भकांचा जन्म झाला असुन त्यापैकी १३१ बालकांचा प्रसुती दरम्यान मृत्यू झाल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये निदर्शनास येणे, जिल्हयातील बहुतांश गरीब महिला प्रसूतीकरिता जिल्हा स्त्री रुग्णालयात येत असुन विविध कारणांनी प्रसूतीदरम्यान बालकांचा मृत्यू होत असणे, अमरावती जिल्हा रुग्णालयात गर्भवती महिलांना दुर्गम भागातील उपजिल्हा रुग्णालये व प्राथमिक आरोग्य केंद्रामधून पाठविण्यात येत असल्यामुळे डफरीन रुग्णालयात आणण्यात येईपर्यंत गर्भवती महिलांची प्रकृती खालावत असणे, जिल्हा स्त्री रुग्णालयात वॉर्डामध्ये २०० खाटांची संख्या असुन दररोज किमान ३५० महिला रुग्ण विविध वार्डात उपचार घेत असणे, अपूरा कर्मचारीवर्ग व अद्ययावत साधनसामुग्रीअभावी या बालमृत्युचे प्रमाण अधिक असल्याने नवजात मुलांच्या पालकांमध्ये पसरलेला असंतोष याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."*

*(३) सर्वश्री.सुरेश हाळवणकर, सुनिल शिंदे, संतोष दानवे वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे कामगार मंत्र्याचे लक्ष वेधतील :-*

*"राज्यातील सर्वच क्षेत्रातील कामगारांसाठी स्वतंत्र कल्याणकारी योजना राबविणारे मंडळ स्थापन करण्याऐवजी सर्वच असंघटीत क्षेत्रातील कामगारांसाठी एकच कल्याणकारी मंडळ स्थापन करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन असणे, त्यामध्ये यंत्रमाग कामगार, शेतमजूर, पत्रकार व वृत्तपत्र विक्रेते, रिक्षाचालक, ट्रकचालक, वाहनचालक आदी घटकांचा समावेश असणे, या सर्व घटकांच्या उत्पन्नावर सेस लावून उत्पन्नाचे साधन निर्माण करणे सुध्दा शासनाच्या*

*विचाराधीन असणे, सदर घटकांचे उत्पन्न कमी असल्यामुळे त्यांना निवृत्तीवेतन, भविष्यनिर्वाह निधी, आरोग्य सुविधा, विमा यासारख्या कोणत्याही कल्याणकारी योजनांचा लाभ मिळत नसणे, परिणामी हे घटक आर्थिकदृष्टया अप्रगत राहून सामाजिक विषमता निर्माण होणे, याबाबत मा. अर्थमंत्री यांच्या समवेत झालेल्या बैठकीत राज्यातील सर्वच क्षेत्रातील कामगांरासाठी एकच कल्याणकारी मंडळ स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात येऊनही अद्याप कोणतीच कार्यवाही करण्यात न येणे, त्यामुळे सदरचे कल्याणकारी मंडळ स्थापन करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."*

चार : *सन २०१७-२०१८ च्या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांवर चर्चा व मतदान (दुसरा दिवस).*

*(१) महसूल व वन विभाग.*

*(२) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग.*

*(३) सार्वजनिक बांधकाम विभाग.*

*(४) आदिवासी विकास विभाग.*

*(५) महिला बालविकास विभाग.*

*(मतास टाकावयाच्या मागण्यांची सूची स्वतंत्रपणे वितरीत केल्याप्रमाणे)*

पाच : *शासकीय विधेयके :*

*(अ) पुर:स्थापनार्थ :-*

*सन २०१७ चे विधानसभा विधेयक क्रमांक १६ — महाराष्ट्र सहकारी संस्था (दुसरी सुधारणा) विधेयक, २०१७.*

---

*(ब) विचार, खंडश: विचार व संमत करणे :-*

*(१) (क) सन २०१७ चे विधानसभा विधेयक क्रमांक १२ - शिकाऊ उमेदवार (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०१७.*

*(ख) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.ओमप्रकाश उर्फ बच्चू कडू, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-*

*"सन २०१७ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक १२ — शिकाऊ उमेदवार (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०१७ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ५१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."*

---

*(२) (क) सन २०१७ चे विधानसभा विधेयक क्रमांक १३ - महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) विधेयक, २०१७.*

*(ख) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.ओमप्रकाश उर्फ बच्चू कडू, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-*

*"सन २०१७ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक १३ — महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) विधेयक, २०१७ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ५१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."*

---

*(३) (क) सन २०१७ चे विधानसभा विधेयक क्रमांक १५ — सिम्बॉयोसिस कौशल्य व मुक्त विद्यापीठ विधेयक, २०१७.*

*(ख) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.ओमप्रकाश उर्फ बच्चू कडू, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-*

*"सन २०१७ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक १५ — सिम्बॉयोसिस कौशल्य व मुक्त विद्यापीठ विधेयक, २०१७ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ५१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन*

*विचारार्थ पाठविण्यात यावे."*

*विधान भवन,*
*मुंबई,*
*दिनांक : २४ मार्च, २०१७*

*डॉ. अनंत कळसे,*
*प्रधान सचिव,*
*महाराष्ट्र विधानसभा.*